ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# बदलते ग्रामीण साहित्य : विचार आणि वेगळेपण

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय,नागपूर.

## प्रास्ताविक :



मराठी साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेत साठोत्तरी कालखंडात जे विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले, त्या साहित्य प्रवाहांमध्ये ग्रामीण साहित्य प्रवाह हा एक महत्त्वपूर्ण साहित्य प्रवाह म्हणून ओळखला गेला आहे. ग्रामीण जीवन जाणिवांना साकार करणारी एक विचार दृष्टी या कालखंडात निर्माण झाली आणि परंपरागत जीवनसरणी अनुसरून जगणारा कृषिवल साहित्यातून अभिव्यक्त होऊ लागला. जसा काळ बदलत गेला, ग्रामीण साहित्याच्या दिशाही अधिकाधिक विकसित होत गेल्या. या बदलत्या काळाला अनुसरणारे ग्रामीण लेखक आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती वेगवेगळ्या साहित्यप्रकाराद्वारे करू लागले. त्यातूनच ग्रामीण साहित्य अधिकाधिक समृद्ध होत गेले.

ग्रामीण साहित्य लेखनाच्या प्रवाहात अमुलाग्र स्वरूपाचा बदल झाला तो १९८० नंतरच्या कालखंडात. या काळात आधुनिकीकरणाने मानवी जीवनात झपाट्याने विकास घडवून आणला. या विकासात शहरे जशी बदलत गेली, त्याच पटीत ग्रामीण जीवनही बदलत गेले. या बदलत्या ग्रामीण जीवनाचे साद–पडसाद ग्रामीण साहित्यातून नेमकेपणाने अभिव्यक्त होत गेले. तसे पाहता ग्रामीण संवेदनशीलतेतून होणारे लेखन मात्र काळानुरूप बदलत गेले आहे. त्यामुळेच ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने बदलते ग्रामीण साहित्य आणि त्याचे स्वरूप व वेगळेपण स्पष्ट करता येईल.

ग्रामीण साहित्य निर्मितीने मराठी साहित्याचे क्षेत्र अधिकाधिक समृद्ध केले. हे जरी खरे असले, तरी बदलत्या काळानुरूप ग्रामीण साहित्याची होणारी घुसमट ही विचारात घेण्यासारखी आहे. खरेतर लोकशाही जीवनमूल्य स्वीकारलेल्या आपल्या देशात सामान्य माणसाला किंमत प्राप्त झाली असली, तरी ती केवळ कागदावरच राहिलेली आहे. प्रत्यक्षात मात्र सामान्य माणसांच्या मुसक्या आवळण्याचे काम झाले आहे. या सामान्य माणसाच्या विद्यमान जीवनाचे वास्तव चित्र ग्रामीण साहित्यातून येणे अपेक्षित आहे. परंतु, आज या ग्रामीण वास्तवाकडे मात्र कोणाचीही दृष्टी जात नाही, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. ग्रामीण जीवनानुभव अभिव्यक्तीच्या प्रेरणा घेऊन सुरू झालेला ग्रामीण साहित्याचा प्रवाह १९६० ते १९८०, १९८० ते २००० अशा वेगवेगळ्या कालखंडात अधिकाधिक समाजाभिमुख होत गेला. अवतीभोवतीच्या बदलत्या वास्तवाविषयीचे चित्रण ग्रामीण लेखकांनी अभिव्यक्त केले. ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या या काळाला अधोरेखित करताना डॉ.द.ता.भोसले म्हणतात,''१९८० नंतरच्या काळात या साहित्य प्रवाहात एक लक्षणीय बदल घडलेला दिसतो. तो म्हणजे तळागाळातला तरुण मोठ्या आत्मविश्वासाने लिहू लागला, या तरुणाचे

नाळ सद्यस्थितीशी आणि आजच्या ग्रामीण जीवनाशी अजूनही पक्की बांधलेली आहे. तो स्वत:ही खेड्यात जगतो, स्वत:ही शेती कसतो, त्यामुळे अवतीभोवतीचे बदलते वास्तव, त्यांच्या चिंतनाचा व लेखनाचा विषय झाला नाही तरच नवल. हा तरुण लेखक वर्ग नागर वाचकांच्या मनोरंजनाचा विचार न करता किंवा अभिरुचीला शरण न जाता अतिशय गांभीर्याने लेखन करतो आहे.''[१] भोसले यांनी १९८० नंतरच्या ग्रामीण साहित्यात झालेल्या बदलाचे नेमके स्वरूप चित्रित केलेले आहे. या कालखंडात तळागाळातला तरुण शिक्षणाने आत्मभान आलेला असल्यामुळे आपल्या सभोवतालच्या वास्तवाला तो साहित्यातून अभिव्यक्त करू लागलेला दिसून येतो. त्यामुळेच या कालखंडात ग्रामीण साहित्यात भरीव स्वरूपाची भर पडलेली दिसून येते.

ग्रामीण जीवन हे या काळात नव्या जीवन संस्कृतीच्या अधिकाधिक आहारी गेलेले असल्यामुळे मनोरंजनवादी वृत्तीचा कल ग्रामीण जीवनात अधिक वाढत गेला. तरुणांनी या नव्या जीवन संस्कृतीला अधिकाधिक स्वीकारले. परिणामी, ग्रामीणत्त्वाची जाणीव हळूहळू कमी होऊ लागली. परंपरागत आचार—विचार या एकूणच ग्रामीण समाजव्यवस्थेवरती आणि ग्रामीण संस्कृतीवरती नव्या जीवन संस्कृतीचा खूप मोठा आघात होत गेला. त्यातून ग्रामीण समाजामध्ये मोठ्या प्रमाणात दरी निर्माण होत गेली. दोन पिढ्यांमधील अंतरही वाढत गेले. परंपरेने चालत आलेला शेती व्यवसाय हळूहळू नकोसा होऊ लागला. चैनी व विलासी मनोवृत्ती अधिकाधिक वाढत जाऊ लागली. अशा ग्रामीण मनोवृत्तीतून निर्माण झालेल्या संघर्षाचे चित्रण या काळातील ग्रामीण लेखकांनी कलात्मकतेने साकार केले आहे. ही ग्रामीण समाजजीवनातील बदलती विचारधारा ग्रामीण साहित्य निर्मितीची प्रेरणा होऊन पुढे आलेली आहे. याविषयी भाष्य करताना डॉ.नानासाहेब सूर्यवंशी लिहितात,''आज ग्रामीण समाज संघर्षाच्या पवित्र्यात आहे, ती ग्रामीण समाजजीवनाची मानसिकता आहे, त्याचा विचार करणे व त्या मानसिकतेचे चित्रण करणे ही आणखी एक ग्रामीण साहित्य लेखनामागची प्रेरणा दिसते. राजकीय पुढाऱ्यांचे गुन्हे, भ्रष्टाचारी आणि स्वार्थी वृत्ती, सामाजिक परिवर्तन करु पाहणाऱ्या कार्यकर्त्यांचे ढोंग, धार्मिक पातळीवर ढोंग, बुवाबाजी वाढत आहे. याचा परिणाम असा होत आहे की, समाजात चारित्र्य, नैतिकता, शील, देशनिष्ठा, ध्येयनिष्ठा, त्याग, राष्ट्रप्रेम, सामाजिक हिताची तळमळ असणारी आदर्श व्यक्ती कोणी दिसत नाही. बलात्कार, खून, हत्या, भ्रष्टाचार, वासनाकांड, दंगली नित्याच्या बनल्या आहेत. याचा परिणाम ग्रामीण समाजात होत आहे. आज ग्रामीण समाजजीवनात असंतोष, चीड, विद्रोह, संघर्ष वाढत जात आहे. असे दिसते की, पुढारी, अधिकारी, कर्मचारी यांच्याकडे सत्ता—संपत्ती केंद्रीत होत आहे. याची ग्रामीण माणसाला जाणीव होत आहे.''[२] या जाणिवेतूनच खऱ्या अर्थाने साहित्य कलाकृतीत समाजाची वास्तवता अभिव्यक्त होत होती. ग्रामीण समाज जीवनात होणाऱ्या बदलाला ग्रामीण साहित्य लेखक कशा पद्धतीने व्यक्त करीत होते, याचे प्रत्यंतर वरील विवेचनावरून येते.

ग्रामीण समाज जसजसा आधुनिकीकरणाने वेढावत गेला, तसतसे त्या समाजातील वेगवेगळे प्रश्न वाढत गेलेले दिसून येतात. ग्रामीण समाजात जीवघेण्या प्रश्नांची मालिकाच निर्माण होत गेलेली पहावयास मिळते. या बदलत्या जीवन वास्तवाचे वेगवेगळे पदर ग्रामीण साहित्यिक आपल्या अभिव्यक्तीद्वारे रेखाटत आले आहेत. ग्रामीण साहित्याच्या या विशेषामुळेच ग्रामीण साहित्याला आज मराठी साहित्यात सन्मानाचे स्थान मिळालेले आहे. असे असले तरी आजच्या काळाच्या अनुषंगाने ग्रामीण नव्या दमाच्या तरुणांनी या चळवळीला अधिकाधिक योगदान देण्याची गरजही निर्माण झालेली आहे. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्याला हे नवे रूप दिलेले आहे. त्याला अधिकाधिक ठळक करण्याची गरज वर्तमानात निर्माण झाल्याचे दिसून येते. ग्रामीण लेखकांच्या या विचार दृष्टिकोनाला व्यक्त करताना रा.रं.बोराडे म्हणतात,''नव्या पिढीतल्या ग्रामीण लेखकालाही आता वास्तवाचं भान ठेवून लेखन करायला पाहिजे. आज खेड्यात स्थित्यंतरे होत आहेत. जुन्या खेड्यांनी आता कात टाकलेली आहे. बदलत्या काळाच्या संदर्भात आज नवीन समस्या निर्माण होत आहेत. नवे ताण निर्माण होत आहेत. या नव्या समस्यांच्या ताणांच्या संदर्भात माणसा—माणसांमधील संदर्भ बदलत आहेत. या नव्या समस्या, आर्थिक स्वरूपाच्या आहेत. सामाजिक स्वरूपाच्या आहेत. तसेच कौटुंबिक स्वरूपाच्या आहेत. या सर्वांकडे ग्रामीण लेखकांनी डोळसपणे बघायला हवं. त्याचं वास्तव चित्र मराठी वाचकांसमोर ठेवायला हवं.''[३] नव्या पिढीतील ग्रामीण लेखकांसाठी बोराडे यांनी व्यक्त केलेला आशावाद आज वर्तमानात सार्थक ठरलेला आहे का? हा प्रश्न खरे तर अनुत्तरीतच

राहतो असेच म्हणावे लागेल. कारण ग्रामीण समाजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिवसेंदिवस धुसरच होत चाललेला आहे. म्हणूनच बदलत्या ग्रामीण साहित्याकडे अधिक सजगतेने पहाणे गरजेचे आहे.

जागतिकीकरणाच्या रेट्यात गावाला शहराचे रूप प्राप्त झाले व गावे जगाशी जोडली गेली. परंतु, या भौतिक बदलाबरोबर होणारे सामाजिक, कौटुंबिक बदल मात्र अत्यंत जीवघेण्या स्वरूपाचे आहेत असे म्हणावे लागेल. वाढत जाणारी बेरोजगारी, लोकसंख्येचा शेती व्यवसायावर पडत जाणारा बोजा, सातत्याने येणारी अस्मानी—सुलतानी संकटं अशा एक ना अनेक प्रश्नांची मालिका ग्रामीण समाजजीवन उध्वस्त करू पाहात आहे. या बदलत्या जीवघेण्या वास्तवात ग्रामीण ही संकल्पना नावापुरतीच शिल्लक राहते की काय? अशी भीतीही व्यक्त केली जाऊ शकते. म्हणूनच ग्रामीण समाज जीवनाचा आत्मा असणारा शेतकरी टिकला पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना अंमलात आणणे गरजेचे आहे. आणि या बदलत्या ग्रामीण माण्काचे वास्तव चित्र साहित्यातून अभिव्यक्त होणे गरजेचे आहे असे वाटते. माणसांच्या जगण्यात सर्वच क्षेत्रात वैश्विकता निर्माण झालेली आहे. परंतु, भारतीय समाजजीवनाचा महत्वाचा भाग असणारी खेडी मात्र अभावग्रस्ततेच्या पोकळीत गुदमरत आहेत. हे वास्तव आज साहित्यातून पुढे येणे काळाची गरज झालेली आहे. ग्रामीण लेखकांच्या या प्रवृत्तीला अधिक भान निर्माण होणे कसे गरजेचे आहे, ते सांगताना डॉ.द.ता.भोसले लिहितात,''भूक, दारिद्र्य, अज्ञान, सोशिकता आणि उपेक्षा या पलीकडेही ग्रामीण जीवनात काही अनुभव असतात. काही अनुभव तरल काव्यात्म जातीचे असतात याची जाणीव लवकर होणे आवश्यक आहे. या जीवनाचा परीघ या वैशिष्ट्यपूर्णतेत सीमित नाही याचे भान येणे गरजेचे आहे. त्याशिवाय ग्रामीण साहित्याला व्यापकत्व, समृद्धी, प्रवाहीपणा येणार नाही. तो जर यायचा असेल तर ग्रामीण साहित्यामध्ये नवनवीन स्वरूपाच्या प्रवृत्तींचे निदर्शक लेखन होते आहे, त्या प्रवृत्तीला आणि लेखनाला पुष्टी करीत जाणे एवढाच एक उपाय सांगता येण्यासारखा आहे. या नव्या प्रवृत्तींची जोपासना ग्रामीण साहित्यातील नामवंतांनी आणि हितचिंतकांनी आता निष्ठापूर्वक करण्याची वेळ आलेली आहे. यात शंकाच नाही. कारण सध्या सुवर्णकण कमी नि सुवर्णा समान भासणारे धूलिकण ज्यादा अशी अवस्था या साहित्याची होऊ लागलेले आहे. म्हणूनच ही चिंता बाळगणे मराठी सारस्वताच्या अभिवृद्धीसाठी एक गरज बनली आहे.''[४] डॉ.द.ता.भोसले यांनी वर्तमान मराठी ग्रामीण साहित्याची झालेली अवस्था आणि त्याविषयी व्यक्त केलेली चिंता खरेच विचार करण्यासारखी अशीच आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य निर्मितीकडे अधिक डोळसपणे पाहण्याची दृष्टी आजच्या ग्रामीण लेखकांना निर्माण झाली पाहिजे. तरच ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिकाधिक समृद्ध होईल.

## समारोप :

सारांश रूपाने असे सांगता येते की, ग्रामीण जीवन वास्तवाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण माणसाच्या जगण्यात निर्माण होतील ते प्रश्न अधोरेखित करण्यासाठी व मराठी साहित्यापासून अलिप्त असणाऱ्या जीवन वास्तवाला साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी निर्माण झालेला ग्रामीण साहित्याचा प्रवाह प्रारंभापासून २००० पर्यंत अधिकाधिक वेगाने वाढत राहिला. परंतु वर्तमानात मात्र या प्रवाहाच्या दिशा आणि दशा याविषयी चिंता बाळगणे गरजेचे झालेले आहे.

## संदर्भ :

१. डॉ.द.ता.भोसले, साहित्य:आस्वाद आणि अनुभव, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२०१८, पृ.१३.
२. डॉ.नानासाहेब सुर्यवंशी, ग्रामीण साहित्य मूल्य आणि अभिरूची, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१५, पृ.१८, १९.
३. रा.रं.बोराडे, ग्रामीण साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ.१९९२, पृ.२३.
४. डॉ.द.ता.भोसले, ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मनोविकास प्रकाशन, पुणे, दु.आ.२००९, पृ.५५.